भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. १०३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १३/०२/२०१७

१) घरघुती कारणावरुन भांडण करुन चाकुने वार करुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक ११/०२/२०१७ चे २३.०० ते २३.३० वा. दरम्यान. यातील फिर्यादी जखमी सौ. मेघा दिपक खडसे वय २३ वर्ष ही २ वर्षा पुर्वी पासुन दिपक खडसे रा. आंबाटोली आंबेडकर वार्ड तुमसर हीचे सोबत राहत असुन नेहती घरघुती कारणावरुन त्यांच्यात भांडण होत होते दि ११/०२/२०१७ चे २३.०० वा. घरघुती कारणावरुन दिपक खडसे याने जखमी सोबत भांडण करुन जखमीचे पोटावर, मानेवर व कमरेवर डावे बाजुस मारुन जिवानीशी ठार मारण्याच्या उद्देशाने चाकुने वार करुन जखमी केले व दि. १२/०२/२०१७ चे ०९.०० वा. सु. बो. दवाखाना तुमसर येथे औषधोपचार करीता करुन पळुन गेला फिर्यादी जखमीचे एमएलसी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३०७ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. जाधव हे करीत आहेत.

२) तरुणीचा विनयभंग केल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक १२/०२/२०१७ चे १९.०० वा. दरम्यान. यातील फिर्यादी ही गावातील आटा चक्कीवर दळण लावण्या करीता जात असतांना यातील आरोपीने फिर्यादीस थांबवुन अश्लिल कृत्याच्या मागणी करुन त्या मोबदल्यात ५,०००/–रु. देतो असे बोलले फिर्यादीने आपल्या भावाकडे तुझे नाव सांगतो असे बोलले असता आरोपीने शिवीगाळ करुन फिर्यादीस अडवुन तिचा विनयभंग केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३४१,३५४(अ)(१)(२)२९४ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. टेभुर्णेकर पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

३) अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन तरुणीचा विनयभंग केल्याने गुन्हा नोंद . :–

दिंनाक १०/०२/२०१७ रोजी २०.०० वा. दर. यातील फिर्यादी व आरोपी यांचे प्रेमसंबध होते परंतु आरोपी हा फिर्यादीला धमक्या देवुन जबरदस्तीने प्रेम संबध झाल्याने वर्तवणुक करुन फिर्यादीला मारपीट करुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन तु मुझे नही मिली तो तेरे काका, माँ, बाप को मार के रहुंगा अशी धमकी दिल्याने फिर्यादीचे लेखी व डॉ. रिपोर्ट वरुन पो. स्टे. अडयाळ येथे अप क्र. ००१७ चे कलम ३५४(अ),१(४)(ब),२९४,३२३,५०४ भादंवि चे कागदपत्र पो.स्टे. ला प्राप्त झाल्याने पोलीस स्टेशन भंडारा येथे ३५४(अ),१(४)(ब),२९४,३२३,५०४ भांदवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. गायकवाड पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहे.

४) मोटार सायकलची चोरी . :–

दिनांक ११/०२/२०१७ चे १५.३० वा. दरम्यान. यातील फिर्यादी प्रमाद नारायनदास तितीरमारे वय ४० वर्ष, रा. श्रीरामनगर तुमसरने मांडगी शेतशिवारातील आपले शेतात मोटार सायकल हिरो होंडा- कंपनीची सुपर स्प्लेंडर क्र. एमएच ३१ डीएम ९९४५ किंमती ३०,०००/–रु. ची रोडचे कडेला ठेऊन गेले असता कोणीतरी अज्ञात चोराने सुना मौका पाहुन चोरुन नेल्याने फिर्यादींचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३७९ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. माहुर्ले पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

५) चारचाकी वाहनाची चोरी . :—

दिनांक ११/०२/२०१७ चे २३.०० ते १२/०२/२०१७ चे ८.३० वा. दरम्यान. यातील फिर्यादी रुपेश गोपाल गोस्वामी वय २८ वर्ष, रा. दवडीपार बाजार यानी आपली टाटा एस वाहन क्र. एम एच ३१ सी क्यु ६०२१ किंमती १,९०,०००/—रु. ची पिवळया रंगाची वाहन गावी घेवुन जात असतांना रस्त्या मध्ये वाहन बंद पडल्याने कारधा येथे रोडचे बाजुला खुल्या जागेत लॉक करुन ठेवली असता कोणीतरी अज्ञात आरोपीने सुनामौका पाहुन चोरुन नेल्याने फिर्यादींचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ३७९ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मनगटे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

६) अवैध दारु अडयांवर धाडी . :—

दिनांक १२/०२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. जवाहरनगर, कारधा, करडी, वरठी, तुमसर व साकोली येथील अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ७ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन ४४ लिटर हातभट्टी दारु किंमती २,३९०/—रु. व ०९ लीटर देशी दारु किंमती २५००/—रु. असा एकुण किंमती ४,८९०/—रू. चा माल जप्त करण्यात आला आहे.

(एस. व्ही. कुलकर्णी )
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.